24-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/23/2025 11:10 PM Page 1




पत्रादेवी चेकपोस्टसमोर ट्रकने दुचाकीस्वाराला चिरडले पान २ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



प्ले ऑफसाठी राजस्थानला विजय आवश्यक पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २४ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 231 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 24 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### गुजरातमध्ये विमान कोसळून पायलट ठार

अहमदाबाद, दि. २३ : गुजरातच्या अमरेली जिल्ह्यात एका निवासी भागात खासगी विमान कंपनीचे प्रशिक्षणार्थी विमान कोसळल्याने प्रशिक्षणार्थी पायलटचा मृत्यू झाला. विमान जमिनीवर कोसळण्यापूर्वी गिरक्या घेत एका झाडावर आदळले. येथील गिरिया रोड परिसरात दुपारी १२.३० वाजता अज्ञात कारणांमुळे विमानाला अपघात झाला. पायलट प्रशिक्षणार्थी असूनही त्याने एकटय़ाने अमरेली विमानतळावरून उड्डाण केले, असे पोलीस अधीक्षक संजय खरात यांनी सांगितले. विमान कोसळताच ते आगीच्या भक्ष्यस्थानी गेले. सुदैवाने या अपघातात अन्य कोणीही जखमी झाले नाही. दिल्लीस्थित एव्हिएशन अकादमी अमरेली विमानतळावरून पायलटना प्रशिक्षण देते. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

------------

### रामदेवबाबांना न्यायालयाने खडसावले

नवी दिल्ली, दि. २३ : 'रूह अफजा' या प्रसिद्ध सरबताशी बाजारात दोन हात करण्याऐवजी त्याची शरबत जिहाद' अशी संभावना करणाऱ्या 'पतंजली' फेम रामदेव बाबांना दिल्ली उच्च न्यायालयाने चांगलेच खडसावले. तसेच भविष्यात या प्रकारचे वादग्रस्त वक्तव्य, जाहिराती किंवा सोशल मीडिया पोस्ट करणार नाही, याची ग्वाही देणारे प्रतिज्ञापत्र पाच दिवसांत सादर करण्याचे आदेश रामदेव बाबांना दिले आहेत. या प्रसिद्ध सरबताच्या ब्रँडविषयी खोटेनाटे वृत्त पसरविणाऱ्या रामदेव बाबांची जाहिरात पाहून आम्हाला डोळ्यांवर आणि कानांवर विश्वास बसत नाही, अशा संतापजनक शब्दांत न्या. अमित बन्सल यांनी रामदेव बाबांना फैलावर घेतले. जाहिरातीचे बिलकूल समर्थन करता येणार नाही. यामुळे सदसद्विवेकबुद्धीलाच धक्का बसला आहे, अशी स्पष्टोक्ती न्यायालयाने केली. न्यायालयाच्या या पावित्र्याने रामदेव बाबांनी माफी मागत वादग्रस्त जाहिरात मागे घेण्याचे आश्वासन दिले.

-------------

### चीन लोक २०30मध्ये चंद्रावर जाणार

वुहान, दि. २३ : जगाच्या पाठीवर चीन प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. भारतात अद्याप ५ जी इंटरनेट सेवा लाँच केली जात असताना चीनने मात्र १0 जी इंटरनेट सेवा लाँच करून आपण किती पुढे आहोत, हे जगाला दाखवून दिले आहे. चीनने याच आठवड्यात एक नवीन क्रू मिशन पाठवण्याची जोरदार तयारी केली आहे. या मिशनचे नाव आहे 'शेनझाऊ-२० मिशन.' हे मिशन उत्तर-पश्चिम चीनच्या जिऊ क्वान सॅटेलाईट लाँच सेंटरहून रवाना केले जाईल. या मिशनअंतर्गत तीन अंतराळवीर जवळपास सहा महिन्यांसाठी अंतराळातील चीनने बनवलेले तियांगोंग स्पेस स्टेशनवर थांबतील. चीनचे हे मिशन यशस्वी झाल्यास चीन २०३० मध्ये चंद्रावर अंतराळ प्रवासी उतरण्याची तयारी करणार आहे. चीन चंद्रावर एक बेस बनवणार आहे. चीनची ही टीम सहा महिने अंतराळ स्टेशनवर वेगवेगळे प्रयोग करणार आहे. चीनच्या अंतराळ एजन्सीने मागील आठवडय़ात म्हटले होते की, शेनझाऊ अंतराळ यान आणि त्याचे लाँच मार्च -२एफ कॅरिअर रॉकेटला जिऊ क्वान सॅटेलाईट लाँच सेंटरवरून पाठवणार आहे.

------------

### इस्तांबूलमध्ये मोठा भूकंप

तुर्की, दि. २३ : तुर्कीमधील इस्तांबूल येथे बुधवारी ६.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. त्याचे केंद्र इस्तंबूलजवळील मरमारा समुद्रात होते. तुर्कीच्या आपत्कालीन व्यवस्थापन संस्थेने बुधवारी सांगितले की, भूकंपामुळे अद्याप कोणतेही नुकसान किंवा जखमी झाले नाही. जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेसनेही भूकंपाची पुष्टी केली आहे आणि म्हटले आहे की भूकंप जमिनीखाली १0 किलोमीटर खोलीवर होता. भूकंपामुळे शहर आणि आजूबाजूच्या परिसरात जोरदार हादरे बसले.

# पाकिस्तानची नांगी ठेचण्यास सुरुवात!

## सिंधू पाणी करार रद्द | पाकड्यांना भारत सोडण्यास एका आठवड्याची मुदत

■ नवी दिल्ली, दि. २३ :

**पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानच्या अतिरेक्यांनी भारतात २८ जणांना ठार मारल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. भारताने पाकिस्तानसोबतच्या १९६० च्या सिंधू पाणी कराराला तात्काळ प्रभावाने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पाकिस्तानने सीमापार दहशतवादाला सतत पाठिंबा देणे थांबवले नाही, तोपर्यंत लागू राहील.**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, ज्यामध्ये पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आला. यासोबतच अटारी सीमा देखील बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्यासह अनेक उच्च अधिकारी उपस्थित होते.

भारत सरकारने अटारी एकात्मिक तपासणी नाका तात्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून सरकारने स्पष्ट केले आहे की, ज्यांनी वैध कागदपत्रे सादर केली आहेत, ते १ मे २०२५ पूर्वी या मार्गाने परत जाऊ शकतात.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितले की, पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा एक्झेम्प्शन स्कीम (एसव्हीईएस) अंतर्गत भारतात प्रवेश करणे बंद करण्यात आले आहे. एसव्हीईएस अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना आधी दिलेले सर्व व्हिसा रद्द मानले जातील आणि भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडावा लागेल. नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई दल सल्लागारांना पर्सना नॉन-ग्राटा घोषित करण्यात आले आहे. त्यांना भारत सोडण्यासाठी एका आठवड्याची मुदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भारत आपल्या इस्लामाबादमधील उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई दल सल्लागारांना परत बोलावणार आहे.

दोन्ही देशांमधील उच्चायुक्तालयांमध्ये कर्मचारी संख्या हळूहळू ५५ वरून ३० पर्यंत कमी केली जाईल. हा निर्णय १ मे २०२५ पासून लागू होईल. केंद्रीय सुरक्षा समितीने देशातील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला आणि सर्व सुरक्षा दलांना अत्यंत सतर्क राहण्याचा आदेश दिला आहे. पहलगाम हल्ल्याचा कट रचणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे सांगण्यात आले. भारताविरुद्ध अतिरेकी कारवाया करणाऱ्यांना माफ करण्यात येणार नाही, असाही स्पष्ट संदेश देण्यात आला.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितले की, पहलगाम हल्ल्याचा संपूर्ण जगभरातून निषेध करण्यात आले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फोनवरून पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा केली आणि भारताला पूर्ण पाठिंबा व्यक्त केला. ट्रम्प यांनी 'एक्स' वर लिहिले की, काश्मीरमधून खूप दुःखद बातमी येत आहे. अतिरेक्यांविरुद्धच्या लढाईत अमेरिका भारतासोबत उभी आहे.

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी या हल्ल्याला क्रूर ठरवले आणि भारतासोबत उभे राहण्याचे आश्वासन दिले. युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी हल्ल्याचा निषेध करत, भारताच्या इच्छाशक्तीला अढळ असल्याचे म्हटले. जर्मन परराष्ट्र मंत्रालयाने देखील या हल्ल्याचा निषेध केला आणि भारतासोबत असण्याचे स्पष्ट केले.



# काश्मीरात अडकलेल्या गोव्याच्या पर्यटकांना परत आणणार

▶ मुख्यमंत्र्यांनी वाढदिवस सोहळा केला रद्द

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३ :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गोव्यात सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यात आली असून, पोलिस यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बुधवारी दिली.

मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, गोवा हे पर्यटनप्रधान व किनारपट्टीचे राज्य असल्यामुळे येथे सुरक्षेचा नेहमीच विशेष विचार केला जातो. मात्र, काश्मीरमध्ये घडलेल्या घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून राज्यात सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी पहलगाम येथील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, बळी गेलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचे त्यांनी सांगितले. २२ एप्रिल रोजी झालेल्या या हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. बळी गेलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांसोबत आम्ही संवेदना व्यक्त करतो आणि जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो, असे ते म्हणाले. दहशतवादाच्या विरोधात केंद्र सरकार करत असलेल्या प्रयत्नांना गोवा सरकारचा पूर्ण पाठिंबा आहे. आम्ही शांतता, सौहार्द आणि कायद्याचे राज्य राखण्यासाठी देशवासियांसोबत उभे आहोत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी गुरुवारी होणारा त्यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पक्षातर्फे नियोजित वैद्यकीय शिबिरे आणि अन्य सेवा उपक्रम नियोजित वेळापत्रकानुसारच पार पडतील, अशी माहिती त्यांनी दिली. कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी त्यांच्या निवासस्थानी येऊन शुभेच्छा देण्यासाठी गर्दी करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

दहशतवादी हल्ल्याच्या वेळी गोव्यातील तीन जोडपी त्या परिसरात असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, सुदैवाने ही घटना घडण्याच्या १५ मिनिटांपूर्वीच ते त्या ठिकाणाहून निघाले होते, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या २६ गोमंतकीय जम्मू-काश्मीरमध्ये आहेत आणि आम्ही त्यांच्याशी संपर्कात आहोत. त्यांना सर्वतोपरी मदत आणि माहिती उपलब्ध करून देण्याचा सरकार प्रयत्न करत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. जम्मू-काश्मीरमधून गोमंतकीय पर्यटकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे स्थानिक टूर ऑपरेटरांनी सांगितले. गोवा ॲडव्हेंचर क्लबचे सहसंस्थापक अहराज मुल्ला यांनी सांगितले की, हल्ला झालेल्या दिवशी गोव्याहून गेलेला एक गट पहलगाम बाजारात होता, तर दुसरा गट सोनमर्गमध्ये होता. पान २ ▶

# पोलिस निरीक्षक गुडलर, कॉन्स्टेबल निलंबित

▶ लाचप्रकरणी अटकेनंतर उपमहानिरीक्षकांकडून आदेश

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २३** : दक्षता खात्याच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने (एसीबी) लाच घेताना अटक केलेल्या कोकण रेल्वे पोलिस निरीक्षक सुनील गुडलर आणि कॉन्स्टेबल मोहम्मद हुसेन या दोघांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. उपमहानिरीक्षक अजय कृष्णन शर्मा यांनी निलंबनाचे आदेश जारी केले आहेत.

या प्रकरणी कर्नाटकातील मांस पुरवठादाराने सोमवार २१ रोजी एसीबीत तक्रार दाखल केली होती. त्यात गुडलर याने तक्रारदाराला गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. गुन्हा नोंद न करण्यासाठी तक्रारदाराकडे २ लाख रुपयांची लाच मागितली होती. पहिला हप्ता म्हणून त्याला २५ हजार रुपये देण्यास सांगितले होते. याप्रकरणी तक्रारदाराने एसीबीकडे पुरावे सादर केले.


एसीबीचे अधीक्षक नेल्सन अल्बुकर्क आणि उपअधीक्षक राजन निगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सतीश गावडे यांनी दि. २१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला. एसीबीकडे तक्रार दाखल करून रेल्वे पोलिस स्थानकात जाऊन गुडलर याला महिन्याचा २५ हजारांचा हप्ता दिला. लगेचच पोलिस स्थानकाच्या बाहेर असलेल्या एसीबीच्या पथकाने छापा टाकून ही रक्कम गुडलरच्या टेबलच्या ड्रॉव्हरमधून जप्त केली होती. त्यानंतर त्याचदिवशी सायंकाळी कोकण रेल्वे पोलिस निरीक्षक गुडलर याच्यासह कॉन्स्टेबल मोहम्मद हुसेन याला ताब्यात घेऊन दि. २२ रोजी पहाटे सुमारे ४ वा. त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्या दोघांना मडगाव येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना सात दिवसांची एसीबीची कोठडी ठोठावली. याच दरम्यान कोकण रेल्वे पोलिसांनी तसेच एसीबीने वरील प्रकरणाचा अहवाल पोलिस मुख्यालयाला पाठवला. याची दखल घेऊन पोलिस उपमहानिरीक्षक अजय कृष्णन शर्मा यांनी आदेश जारी करून त्या दोघांना सेवेतून निलंबित केले आहे.

# बहुमजली बांधकामांची परवानगी देण्यास गोवा बचावचा विरोध

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३** : गोवा बचाव अभियान ने बुधवारी पूरग्रस्त क्षेत्रांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली आणि राजधानी पणजीत ३०० मीटर उंची आणि ४० मीटर उंचीच्या बहुमजली इमारतींच्या बांधकामासाठी प्रस्तावित परवानगीला विरोध केला. यासोबतच, या भागांना त्यांच्या मूळ झोनिंगमध्ये परत आणण्याचे आवाहन केले.

पत्रकार परिषदेत बोलताना, माजी नगरसेवक पेट्रीसिया पिंटो आणि जीबीए संयोजक सबिना मार्टिन्स यांनी सांगितले की, आपल्याला पणजी आणि गोव्यातील नागरिकांना पूराच्या भीतीशिवाय जीवन जगण्याची आवश्यकता आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये ढगफुटीमुळे झालेल्या विध्वंसाचे दृश्य आम्ही पाहिले आहे. फक्त एका ढगफुटीमुळे पणजीही पूरग्रस्त होऊ शकते. टीसीपी मंत्र्यांच्या वनीकरणाच्या



कल्पनेचे आम्ही स्वागत करतो, परंतु त्याचवेळी टीसीपी मंत्री यांनी पणजीच्या सर्व पूरग्रस्त क्षेत्रांचे पुनर्वसन करण्याच्या विषयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. हे मुख्य नगररचनाकाराच्या आदेशांच्या विरोधात आणि लागू असलेल्या सीआरझेड कायद्यांच्या पालनात नाही.

पिंटो यांनी सांगितले की, पणजीच्या विकास आराखड्यात क्वार्टरडेक म्हणून चिन्हांकित केलेल्या पिंटो क्षेत्रात सरकारने ' एफएआर ' (फ्लोअर एरिया रेशीओ ) ५ टक्क्यांवरून ३०० टक्क्यांपर्यंत वाढवून आणि इमारतींची उंची ४० मीटरपर्यंत वाढवून बहुमजली इमारतींना परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या निर्णयामुळे कॅसिनोमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी मनोरंजन केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट असल्याचा आरोप त्यांनी केला आणि ते पूरप्रवण क्षेत्र असल्याचे मान्य करत असतानाही, टीसीपी विभाग आपल्या आदेशांचे उल्लंघन करत आहे.

प्रस्तावित 'पॅसेंजर रोप वे प्रकल्प' साठी मांडवी नदी ओलांडून कांपालपर्यंतच्या झोनमध्ये बदल करण्यास जीबीएने विरोध केला आहे. रोप वे प्रकल्पासाठी सरकारने रेईश मागूस येथील ८ हजार चौरस मीटर जमीन संपादित केली आहे, ज्यामुळे झाडे तोडावी लागतील, असे पिंटो यांनी सांगितले. या प्रकल्पांमध्ये कृत्रिम स्कीइंग, कृत्रिम स्कायडायव्हिंग, स्कूबा डायव्हिंग, मत्स्यालय, रेस्टॉरंट आणि मुलांसाठी विविध उपक्रम यांचा समावेश आहे. या प्रकारच्या कृत्रिम उपक्रमांना पणजीमध्ये स्थान देण्याची आवश्यकता आहे का? पणजीला नैसर्गिक ठेवणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या. पान २ ▶

# राज्याची कायदा व सुव्यवस्था रसातळाला

## गृहमंत्री म्हणून प्रमोद सावंत अपयशी ठरल्याचा आपचा आरोप | गुन्ह्यांचे वाढलेले प्रमाण चिंताजनक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३ :** राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून गृहमंत्री म्हणून प्रमोद सावंत अपयशी ठरल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे . पक्षाच्या म्हणण्यानुसार, २०२४ मध्ये गुन्ह्यांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे.

आपचे पदाधिकारी फ्रान्सिस कोएल्हो यांनी पत्रकारांशी संवाद साधताना, २०२४ मध्ये नोंदवलेल्या गुन्ह्यांवर आधारित पक्षाच्या स्वतंत्र संशोधनाचा हवाला दिला. यानुसार, २०२४ मध्ये १०६ बलात्कार, २९ खून, २० खून करण्याचा प्रयत्न, ३ दरोडे, १३ घरफोडी आणि



महिलांविरुद्ध ३६५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. २०२३ मध्ये महिलांविरुद्ध २८८ गुन्हे नोंदवले गेले होते, तर यंदा दररोज सरासरी ३६५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, सायबर गुन्ह्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून, ५६ सायबर गुन्हे नोंदवले गेले आहेत. मात्र, या सर्व गुन्ह्यांची तपासाची गती अत्यंत धीमी असून, तपासाचा दर फक्त ३५ टक्के आहे, असे कोएल्हो यांनी सांगितले.

वास्को येथील गायत्री मराठे खून प्रकरणावर देखील कोएल्हो यांनी गंभीर टिप्पणी केली. या प्रकरणात पोलिसांनी तपासाच्या प्रत्येक आवश्यक पैलूला दुर्लक्ष केल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी तपास



सुरू केला असला तरी, त्यांना या प्रकरणाचा हेतू शोधण्यात अपयश आले आहे. ओळख परेड आणि सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची प्रक्रिया पूर्णपणे दुर्लक्षित केली गेली आहे, असे ते म्हणाले. न्यायालयाच्या तज्ञांनी यावर कडव्या शब्दांत टीका केली असून, या तपासावर विश्वास ठेवणे कठीण आहे, असे ते म्हणाले.

पुढे, अंमली पदार्थ विरोधी सेलने (एएनसी) ६.७५ कोटी रुपयांचे ८५ किलो अंमली पदार्थ जप्त केले होते. त्यामध्ये गोव्याच्या इतिहासातील पहिल्यांदाच जप्त केलेले डेट रेप ड्रग्ज, जीएचबी (गामा हायड्रॉक्सीब्युटायरेट) समाविष्ट होते. या घटनेला गंभीर धोक्याची घंटा मानली जात आहे. मात्र पोलिसांनी या बाबत ९६.६७% शोध दर दाखवून सुस्पष्ट अहवाल प्रकाशित केले आहेत, ज्यामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कोएल्हो यांनी जमीन हडप प्रकरणांचा उल्लेख करताना सांगितले की, गेल्या तीन वर्षांत ७०८ तक्रारी दाखल झाल्या आहेत, परंतु केवळ ४७ तक्रारी नोंदवण्यात आल्या आणि केवळ आठ प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले. तक्रारींच्या तपासात अनेक अडथळे आहेत, ज्यामध्ये विलंबित फॉरेन्सिक अहवाल, सबबींचा अभाव आणि समन्वयाचा अभाव यांचा समावेश आहे.

तसेच, तुरुंगातून आरोपी सुलेमान 'सिद्दीकी' खानचे पलायन हे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करते. तुरुंगात योग्य नोंदी, पुरेसे कर्मचारी आणि जबाबदारीची कमतरता दिसून आली आहे. याशिवाय, ज्येष्ठ नागरिक आणि एकट्या राहणाऱ्या महिलांच्या बाबतीत धमक्या, घरफोडी आणि खंडणीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पोलिस स्थानकांकडून या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप कोएल्हो यांनी केला.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीसाठी जबाबदार ठरवत, कोएल्हो यांनी म्हटले की, सावंत यांच्याकडे ११ महत्त्वाच्या खात्यांचा भार आहे, मात्र ते आपल्या कॅबिनेट सहकाऱ्यांना या खात्यांची जबाबदारी देत नाहीत. हे खेदजनक आहे, कारण शक्तिशाली लोकांना शिक्षा मिळत नाही, आणि सामान्य लोकांना फसवणुकीला सामोरे जावे लागते, असे ते म्हणाले. गोव्यातील लोकांनी आता या गंभीर समस्यांवर लक्ष ठेवून उत्तरदायित्वाची मागणी केली पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले.